Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/मुल्यांकन/२०२६/ ११८४ दिनांक : १७.०१.२०२६

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक,**
**सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५६(१)(ठ) व ५८(छ) च्या तरतूदीच्या अनुषंगाने हिवाळी-२०२५ च्या नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांच्या संबंधित वेळापत्रकाच्या दरम्यान आंतर विद्यापीठीय/राष्ट्रीय/आंतर राष्ट्रीय क्रिडा स्पर्धामध्ये/कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजनाबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५६(१)(ठ) व ५८(छ) च्या तरतूदीच्या अनुषंगाने हिवाळी-२०२५ च्या नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांच्या संबंधित वेळापत्रकाच्या दरम्यान आंतरविद्यापीठीय किंवा राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धांमध्ये किंवा राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम/आंतर विद्यापीठीय/राष्ट्रीय/आंतर राष्ट्रीय क्रिडा स्पर्धांमध्ये/कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संबंधित पर्यायी व्यवस्था करण्याची सक्षम प्राधिकरणाला शिफारस करणेबाबत तरतूद अधिनियमा अंतर्गत करण्यात आलेली आहे.

**त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांनी विहित पध्दतीमध्ये परीक्षा आवेदन पत्र सादर केलेले आहेत व उपरोक्त तरतुदीनुसार जे विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी पात्र आहेत. अशा सर्व विद्यार्थ्यांच्या हिवाळी-२०२५ च्या नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची परीक्षा आयोजित करण्याच्या अनुषंगाने विहित करुन दिल्याप्रमाणे विनंती अर्ज बुधवार, दि. २८.०१.२०२६ रोजीपर्यंत सादर करण्यात यावे. सदर तारखेनंतर सादर होणारे विनंती अर्जांची नोंद घेतली जाणार नाही. याची कटाक्षाने नोंद घ्यावी.**

करिता, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५६(१)(ठ) व ५८(छ) च्या तरतूदीच्या अनुषंगाने पात्र विद्यार्थ्यांचे विनंती अर्ज सादर करण्यात यावे. ही विनंती.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

या पत्राची प्रत सर्व संबंधित कक्ष प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन विभाग, विद्यापीठ परिसर यांना देऊन उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन विहित पध्दतीने सादर होणाऱ्या विद्यार्थ्यांचे विनंती अर्ज स्विकारुन पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.